## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ७८८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/१२/२०१६

**१)ट्रकची स्कुल बसला धडक देवुन तीन जखमी. :–**

दिनांक ३०/११/२०१६ रोजी ०७.०० वा. दर. यातील स्कुल बस क्र. एमएच ३६ एफ १०७३ चा चालक फिर्यादी हा भंडारा कडे जात असता समोरुन साकोली कडे येणा–या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्कुल बसला धडक ड्रायव्हरचे बाजुस धडक दिल्याने बस मधील बसलेले २ मुले व फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुनील रुषी भोयर वय ३४ वर्ष, रा. कन्हाळगाव ह. मु. सेंदुरवाफा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधी मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२)अज्ञात मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे, एकाचा मृत्यु . :–**

दिनांक ३०/११/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील मृतक रामकृष्ण कडंगु मुगुलमारे वय ५५ वर्ष, रा. सेंदुरवाफा हा आपले मोटार सायकलने सेंदुरवाफा वरुन साकोली येथे सर्वीस रोडने येत असतांनी यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवीने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने डॉ. ममो वरुन व फिर्यादी पांडुरंग सोमाजी मुंगुलमारे वय ४७ वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गांवडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रॅक्ट्रर ट्रालीच्या चालकांच्या लापरवाहमुळे ट्रॉली पलटी होवुन स्वत: मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३०/११/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील आरोपी मृतक चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये ऊस भरुन घेवुन जात असतांना वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन ट्रक्ट्रर ट्रॉली पलटी होवुन त्या ट्रालीत मृतक आरोपी हा स्वत: ट्रॉलीमध्ये दबुन मरण पावल्याने फिर्यादी मनोहर बळीराम परशुरामकर वय ३८ वर्ष, रा. खोडशिवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणा–या महीलेस गंभिर जखमी केल. :–**

दिनांक ३०/११/२०१६ रोजी ११.३० वा. दर. यातील फिर्यादी गौतम काशीनाथ बागडे वय २० वर्ष, रा. शहापुर याची आई जखमी अंजनाबाई काशीनाथ बाभरे वय ६० वर्ष, ही एनएच ०६ रोड पायी क्रास करत असतांना नागपुर कडुन भंडारा कडे जाणा–या अनोळखी पांढ–या रंगाच्या वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमीस धडक मारुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. साखरे यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरगनगर येथे कलम २७९,३३८ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) ट्रकची ट्रकला धडक लागुन दोन जखमी . :–**

दिनांक ३०/११/२०१६ रोजी ०४.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा ट्रक क्र. ओ.आर १९२०बी ३१२१ ला समोरुन धडक मारुन फिर्यादीस गंभिर जखमी होवुन व सोबत असलेल्या हेल्पर विश्वजीत बिंदुरा थाई यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी डिलेश्वर श्रिवास्तव धुरी वय २१ वर्ष, रा. डालकोडा राज्य उडीसा जि. अंगुल यांचे बयाना वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो.स्टे. भंडारा

६) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली . :—

दिनांक १५/०६/२०१६ रोजी १६.०० ते दिनांक २२/१०/२०१६ चे ११.०० वा. दर. यातील आरोपी पानटपरीचे व्यवसाय करत असुन हा दारु पाणी पिऊन लोकांना नेहमीच शिविगाळ करुन व फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी ईश्वर किशन फुंडे वय ५३ वर्ष, रा. केंसलवाडा यांचे लेखी रिपोर्ट वरून व मा. जेएमएफसी कोर्ट सा. पवनी यांचे लेखी आदेशावरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २५४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक ३०/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तिन सिटर वाहनांवरती १० केसेस व ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.






(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.